# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-2557266/46 **कार्यासन दु. क्र.** 0712-2557266

**E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in** **Website: rdtenagpur.org.in**


**तात्काळ**

**क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/तपासणी/2018/** 4392

**दिनांक:-** 27 DEC 2018

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व पदवी / पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

विषय:- शैक्षणिक वर्ष 2018-19 मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/प्रवेश-पडताळणी व मान्यता/, 2018/1592 दि. 19/10/2018

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादया www.safalta.org या संकेतस्थळावर अद्यावत करण्याकरीता कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू अद्यावत केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेमार्फत बाहय यंत्रणेकडून नियुक्त तपासणी पथकाने आपल्या संस्थेत येऊन तपासणीचे काम सुरू केले आहे.

या पत्राव्दारे आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थेचे प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेमार्फत बाहय यंत्रणेकडून नियुक्त तपासणी पथकाने गुणवत्ता यादया तपासणी केल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रामध्ये त्रुटया आढळून आल्या आहेत अशा विद्यार्थ्यांच्या संपुर्ण प्रमाणपत्रासह त्रुटींचे निराकरण करण्याकरीता दि. 28/12/2018 व 29/12/2018 रोजी या कार्यालयात उपस्थित राहावे.

ज्या संस्थेची तपासणी झालेली आहे त्या संस्थेतील विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रात आढळून आलेल्या त्रुटयांचे निराकरण दि. 31/12/2018 पर्यंत करण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविलेले आहे. त्यामुळे त्रुटयांचे निराकरण दिलेल्या कालावधीतच करावी अन्यथा त्याबाबतची सर्व जबाबदारी आपली राहिल याबाबत नोंद घ्यावी.

सहपत्र:- संदर्भिय पत्र

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण वि.का., नागपूर

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/ प्रवेश-पडताळणी व मान्यता /२०१८/ १५८२
दिनांक : 19 DEC 2018

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेसंदर्भात

संदर्भ : प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक संकीर्ण / प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/३४७, दिनांक १९.१२.२०१८

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना दिनांक ३१ जानेवारी २०१९ पूर्वी छाननी करून मान्यता देण्याची महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधे तरतूद आहे.

यासंदर्भाने प्राधिकरणाच्या दिनांक २८.९.२०१८ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेसंदर्भात ऑनलाईन पध्दतीने करावयाची प्रक्रिया विहीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील खाजगी विनाअनुदानीत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांमध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचा तपशील प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलवर (http://www.safalata.org) आपणास उपलब्ध करून देण्यात आलेल्या Login ID व Password च्या आधारे प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची छाननी करून व तदनुषंगाने अभिप्राय नोंदवून अहवाल प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलद्वारे दिनांक ३१ डिसेंबर २०१८ पूर्वी सादर करण्यास प्रवेश नियामक प्राधिकरणाने संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे.

या अनुषंगाने संदर्भाधीन पत्र यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे. प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी दिलेल्या सुचनांनुसार आपल्या विभागाची माहिती विहीत मुदतीत सादर करण्यात यावी.

२४/१२/१८

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा. सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई व मा.आयुक्त ,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सादर

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

**महत्वाचे / कालमर्यादा / ईमेलद्वारे**

क्रमांक: संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/ ३४७

दिनांक : 19 DEC 2018

प्रति,
संचालक तथा नोडल अधिकारी,
वैद्यकीय शिक्षण / तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण /
आयुष शिक्षण / कला शिक्षण / कृषी शिक्षण / मत्स्य व दुग्ध शिक्षण.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेसंदर्भात...

संदर्भ :
१. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १५/१२/२०१८ रोजीच्या बैठकीतील प्राधिकरणाचे निर्देश.
२. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे पत्र क्र. संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/२८७, दिनांक ३०/११/२०१८.
३. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०९/२०१८ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ५.
४. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलवरील Login च्या तपशीलाबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाचा दिनांक २५/०९/२०१८ रोजीचे ईमेल.

विषयांकित प्रकरणास अनुसरुन महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना दिनांक ३१ जानेवारी २०१९ पूर्वी छाननी करुन मान्यता देण्याचे नमूद केलेले आहे.

या अनुषंगाने संदर्भ क्र. २ प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमध्ये आपल्यामार्फत संबंधीत विद्यार्थ्यांचे कागदपत्रे / प्रमाणपत्रांची छाननी करुन व तदनुषंगाने संबंधीत अभ्यासक्रमाच्या प्रवेशास पात्र असणाऱ्या उमेदवारांना सामाईक प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची महाविद्यालय व अभ्यासक्रम निहाय यादी प्रमाणित करुन दिनांक १०/१२/२०१८ रोजी पूर्वी सादर करण्याबाबत कळविले होते, परंतू सदरील माहिती अद्याप प्रवेश नियामक प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही.

तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेचे काम संपूर्ण पणे संगणीकृत करण्याच्या अनुषंगाने 'प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०९/२०१८ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ५ अन्वये संबंधीत संचालकांनी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेसंदर्भात ऑनलाई पध्दतीने करावयाची प्रक्रिया विहित करण्यात आलेली आहे.

सबब महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदीं लक्षात घेऊन तसेच संदर्भ क्र. ३ प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०९/२०१८ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ५ मध्ये नमूद केल्यानुसार कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचा तपशील प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलवर (http://www.safalta.org) उपलब्ध आहे, सदरील पोर्टलवरील आपणास संदर्भ क्र. ४ अन्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Login Id व Password च्या आधारे अभ्यासक्रम व महाविद्यालयनिहाय प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची छाननी करुन व तद्नुषंगाने आपले अभिप्राय नोंदवून आपला अहवाल प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलद्वारे **दिनांक ३१ डिसेंबर २०१८ पूर्वी** सादर करावा.

वरीलप्रमाणे प्राधिकरणाच्या निर्देशानुसार आपले अभिप्राय उक्त नमूद कालावधीत प्राप्त न झाल्यास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमधील प्रवेशित विद्यार्थी आपल्याकडून प्रवेशास पात्र असल्याचे समजण्यात येईल व तद्नुषंगाने प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलवर प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया पूर्ण केलेल्या संबंधीत महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यतेच्या अनुषंगाने उचित निर्णय घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलवरील प्रवेश पडताळणी व छाननी च्या अनुषंगाने अधिक माहितीकरिता दूरध्वनी क्र. ०२०-६७६३५९९९ (Direct), ०२२-२२०१६१५३, ०२२-२२०१६१५७, ०२२-२२०१६१५९ (Ext. No. 272) व ara.helpline@gmail.com हा ईमेल संपर्कासाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(आ.ए. रायते) ~~भा.प्र.से.~~
सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.

प्रत माहितीकरिता अग्रेषित,-
मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,-
१. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे स्वीय सहाय्यक,
२. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे स्वीय सहाय्यक
३. निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.